Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 October 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

दिल्ली इथं झालेला वेस्ट इंडिज विरुद्धचा दुसरा कसोटी क्रिकेट सामना भारताने आज सात गडी राखून जिंकला. सामन्याच्या आजच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा भारताला अवघ्या ५८ धावांची आवश्यकता होती. या विजयासोबतच भारताने दोन सामन्यांची मालिका दोन – शून्य अशी जिंकली आहे.

****

भारताने पाकिस्तानला दहशतवाद, हिंसाचार, धर्मांधता, असहिष्णुता आणि अतिरेकीवादाचे "स्रोत" म्हणलं आहे. न्यू यॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र महासभेच्या उपनिवेशीकरण समितीला संबोधित करताना, भारताचे संसदीय प्रतिनिधी, एन.के. प्रेमचंद्रन यांनी पाकिस्तानने बेकायदेशीरपणे व्यापलेल्या काश्मीरमध्ये मानवाधिकारांचं उल्लंघन थांबवावं अशी मागणी केली. पाकव्याप्त काश्मीरमधले लोक दडपशाही, क्रूरता आणि संसाधनांच्या बेकायदेशीर शोषणाविरुद्ध उघडपणे बंड करत असल्याचं त्यांनी सांगितलं. जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचं प्रेमचंद्रन यांनी स्पष्ट केलं.

****

देशात चालू आर्थिक वर्षात निव्वळ प्रत्यक्ष कर संकलन सहा पूर्णांक ३३ टक्क्यांनी वाढून जवळपास १२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं आहे. प्राप्तिकर विभागाने ही माहिती दिली. एक एप्रिल ते १२ ऑक्टोबर या कालावधीत निव्वळ कॉर्पोरेट कर संकलन अंदाजे पाच लाख कोटी, तर बिगर-कॉर्पोरेट कर संकलन अंदाजे साडे सहा लाख कोटी रुपये झालं. मात्र परतफेड जारी करण्यात १६ टक्क्यांनी घट होऊन दोन लाख कोटी रुपये झालं असल्याचं विभागानं सांगितलं.

****

२०२५ साठीचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार जुएल मोकीर, फिलिप आगियों आणि पीटर हॉविट यांना जाहीर झाला आहे. तंत्रज्ञान किंवा नवोन्मेषामुळे कशारितीनं आर्थिक प्रगती होऊ शकते याबद्दल मोकीर यांनी संशोधन केलं. त्यांना या पुरस्कारातली अर्धी रक्कम दिली जाईल. उर्वरित अर्धी रक्कम इतर दोघांमध्ये वाटली जाईल. नवीन वस्तू किंवा तंत्रज्ञान बाजारात आल्यावर जुन्या गोष्टी बाजारपेठेतून काढून टाकल्या जातात. याविषयावर आगियो आणि हॉविट यांनी लेख लिहिला होता. त्याबद्दल हा पुरस्कार दिला जात असल्याचं नोबेल समितीनं म्हटलं आहे.

****

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून विभागवार बैठका सुरू आहेत. त्यानुसार काल अमरावती विभागाची बैठक झाली. शक्य तिथे महायुती म्हणून निवडणूक लढवण्याला पक्षाचं प्राधान्य आहे. मात्र त्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. एखाद्या ठिकाणी युती झाली नाही तरी मित्र पक्षावर टीका करू नये, असे निर्देश देण्यात आले असून, महायुती म्हणून या निवडणुकीमध्ये चांगलं यश आमच्या तिन्ही पक्षांना मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

अन्न पदार्थ तपासणीचे अहवाल वेळेत प्राप्त होण्यासाठी लवकरच विभागस्तरावर सहा आणि मुंबई शहरात दोन प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. नाशिक इथं काल सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा जनजागृती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सणांच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबवली जात असून, यात संशयास्पद माव्यापासून तयार करण्यात येणारी मिठाई आणि भेसळयुक्त दुग्धजन्य अन्नपदार्थांच्या नमुन्यांची तपासणी सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

तारखेनुसार धम्मचक्र प्रवर्तन दिन आज साजरा होत आहे. नागपूरच्या दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह बुद्ध धम्माचा स्वीकार केला होता. दसऱ्याच्या दिवशी बाबासाहेबांनी ही दीक्षा घेतली असल्यामुळे विजयादशमीला हा दिवस साजरा केला जातो. नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयात आज धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सुगम संध्या तसंच बुद्ध वंदनेचा कार्यक्रम होणार आहे.

****

दिवाळीनिमित्त समाजमाध्यमांवर विविध कंपन्यांकडून सवलती दिल्या जात आहेत. मात्र, खरेदी योजनांच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करणारे सायबर चोरटेही सक्रिय झाल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. त्यामुळे ऑनलाइन खरेदी करताना काळजी घेण्याचं आवाहन सायबर पोलिसांनी केलं आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा तालुक्यातल्या मोरंबा गावात अवैध दारू निर्मितीचा कारखाना पोलिसांनी उद्धवस्त केला. पोलिसांनी घातलेल्या छाप्यात सुमारे ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी पाच जणांना अटक करण्यात आली.

****

आंतरराष्ट्रीय आपत्ती धोके निवारण दिनाचं औचित्य साधून बीड इथल्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात काल शपथ ग्रहण समारंभ आणि अग्निशमन प्रात्यक्षिकाचं आयोजन करण्यात आलं होतं. अधिकारी, कर्मचारी आणि आपदा मित्र मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

****

दोन वेळा आशियाई विजेती राहिलेल्या भारताच्या जोश्ना चिनप्पाने जपान ओपन २०२५ स्क्वॅश स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावलं. जोश्ना हिनं स्पर्धेच्या अंतिम फेरीत इजिप्तच्या तिसऱ्या मानांकित हया-अलीला पराभूत करून पीएसए चॅलेंजरमधील तिच्या प्रभावी कामगिरीचा शेवट केला.

****